॥ कर्तव्याने घडतो माणुस ॥

गायकः सुधीर फडके
गीतः मनोहर कवीश्वर
संगीतः मनोहर कवीश्वर

श्रीकृष्णः
विमोह त्यागुन कर्मफलांचा सिद्ध होई पार्था ।
कर्तव्याने घडतो माणुस जाणुन पुरुषार्था ॥ धृ. ॥

शस्त्रत्याग तव शत्रूपुढती नच शोभे तुजला ।
कातर होसी समरी मग तू वीरोत्तम कसला?
घे शस्त्राते सुधीर होऊन रक्षाया धर्मार्था ॥ १ ॥

कर्तव्याच्या पुण्यपथावर मोहांच्या फुलबागा ।
मोही फसता मुकशिल वीरा मुक्तीच्या मार्गा ।
इहपरलोकी अशांतिने तव विक्रम झुकविल माथा ॥ २ ॥

कुणी आप्त ना कुणी सखा ना जगती जिवांचा ।
क्षणभंगुर ही संसृति आहे खेळ ईश्वराचा ।
भाग्य चालते कर्मपदांनी जाण खऱ्या वेदार्था ॥ ३ ॥

रंगहीन मी या विश्वाच्या रंगाने रंगलो ।
कौरवात मी, पांडवात मी, अणुरेणुत भरलो ।
मीच घडवितो, मीच मोडितो! उमज अता परमार्था ॥ ४ ॥

कर्मफलाते अर्पुन मजला सोड अहंता वृथा ।
सर्वधर्म परि त्यजुनी येई शरण मला भारता ।
कर्तव्याची साद तुझ्या तुज सिद्ध करी धर्मार्था ॥ ५ ॥